क्र. निशि/मागणी/२०१९/का.क्र.२/प्राधान्य कुटुंब/जा.क्र.७०७
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा
यांचे कार्यालय, एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुबई-४०० ०२०
दूरध्वनी क्रमांक २२०४१८०३/२२०४२८६६
ई मेल :- dycor.ho-mum@gov.in

दिनांक :- १७/१२/२०१९.

प्रति,

१. उप नियंत्रक शिधावाटप,
अ/ई/ग व फ परिमंडळ
२. उप संचालक (गो/वा),
सं.ना.पु. परेल.

**विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे नियमित मासिक नियतन (सुधारीत) माहे जानेवारी, २०२०**

**संदर्भ :-** १.शासनपत्र क्र. अधापु-२०१९/प्र.क्र.८/ना.पु.-२२, दि. ०८ नोव्हेंबर, २०१९
२.क्र. निशि/मागणी/२०१९/का.क्र.२/प्रा. कुटुंब/जा.क्र.६४५ दि. १४.११.२०१९

उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी माहे जानेवारी, २०२० करीता परिमंडळनिहाय नियतन मंजूर करण्यात आले आहे.

वाढीव लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी RCMS सॉफ्टवेअरवर नोंद असलेल्या शिधापत्रिका (म्हणजेच त्या कार्डधारकास E-PoS द्वारे ऑक्टोबर, २०१९ मध्ये धान्य वितरीत करण्यात आले आहे ) गरजेनुसार १००%+१०% नियतन व e-PoS मशिनचा वापर न करता किंवा रुट नॉमिनीचा वापर न करता ऑक्टोबर, २०१९ मध्ये मॅन्युअली धान्य वाटप करण्यात आलेल्या लाभार्थ्यास गरजेनुसार १००% नियतन व माहे ऑक्टोबर, २०१९ अखेर शिल्लक साठा विचारात घेऊन सदरचे माहे जानेवारी, २०२० करिता नियतन मंजूर करण्यात आले आहे.

ई, ग व फ परिमंडळ कार्यालयांकडून माहे डिसेंबर, २०१९ च्या नियतनामधून माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये विक्री केल्याने सदर साठा पुढील महिन्यांत वितरणासाठी कमी पडणार असल्याने वाढीव नियतन मंजूर करण्याची विनंती करण्यात आली आहे. तसेच शिधावाटप कार्यालय क्र. ३६/फ व ४३/ग या कार्यालयांनी माहे जानेवारी, २०२० च्या नियतन कमी पडत असल्याने शिधावाटप कार्यालय क्र. ३९/फ/मुख्य व ३९/फ उप डोंबिवली कार्यालयाने माहे डिसेंबर, २०१९ व जानेवारी, २०२० चे नियतनाकरीता आवश्यकताबाबतची माहिती कळविताना अनुक्रमे माहे सप्टेंबर, २०१९ व ऑक्टोबर, २०१९ मध्ये पूरग्रस्तांना वाटप करण्यात आलेले धान्य शिल्लक साठा अहवालामधून वजा न केल्यामुळे काही अधिकृत शिधावाटप दुकानांना माहे नोव्हेंबर, डिसेंबर, २०१९ व जानेवारी, २०२० मध्ये कमी नियमन प्राप्त झालेले आहे.

तसेच शिधावाटप कार्यालय क्र. ४२/ग या कार्यालयाने प्राप्त हमीपत्रानुसार शिधापत्रिकाधारकांकरीता वाढीव नियतन मंजूर करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेचे पात्र लाभार्थी अन्नधान्याच्या लाभापासून वंचित राहू नयेत म्हणून माहे जानेवारी, २०२० करिता खालीलप्रमाणे सुधारीत नियतन मंजूर करण्यात येत आहे.

**माहे जानेवारी, २०२०  करीता प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत सुधारीत मंजूर नियतन**

(आकडे मे. टन मध्ये)

| अ. क्र. | परि मंडळ | दिनांक १४.११.२०१९ च्या पत्रान्वये मंजूर नियतन | | नियतनात वाढ | | माहे जानेवारी, २०२० करिता सुधारीत मंजूर नियतन | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू |
| | | | | | | | |
| १ | अ | १०५२.२०६ | १५६६.४७४ | ४०.७६३ | ४६.२३८ | १०९२.९६९ | १६१२.७१२ |
| २ | ड | १५५६.९२० | २३६४.११९ | ० | ० | १५५६.९२० | २३६४.११९ |
| ३ | ई | ३६८४.८८५ | ५३८५.८६४ | २७.२०० | ४३.४८१ | ३७१२.०८५ | ५४२९.३४५ |
| ४ | ग | १९७७.१८२ | २९४७.०७२ | ३१.३७७ | ४७.४५८ | २००८.५५९ | २९९४.५३० |
| ५ | फ | ५१०८.७७३ | ७६५२.९५९ | १२५.१७४ | १६७.७७६ | ५२३३.९४७ | ७८२०.७३५ |
| एकूण | | १३३७९.९६६ | १९९१६.४८८ | २२४.५१४ | ३०४.९५३ | १३६०४.४८० | २०२२१.४४१ |

वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या वाढीव नियतनानुसार तात्काळ वितरण आदेश निर्गमित करुन अन्नधान्याची संपूर्ण उचल करण्यात यावी.  तसेच, वाढीव नियतनाचे वाटप पात्र लाभार्थ्यांना होईल याची योग्य ती दक्षता घेण्यात यावी. संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचना कायम रहातील. सदर वाटप e-POS मशिनद्वारे ऑनलाईन पध्दतीने १००% करणे बंधनकारक राहिल.

(कैलास पगारे) भा.प्र.से.
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रत :

१. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २२, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
२. वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचे कार्यालय, जी. टी. हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई.
३. उप नियंत्रक शिधावाटप, अ, ई, ग व फ परिमंडळ यांना माहितीसाठी.